शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे
विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

मंगल कार्यालय
लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
सौभाग्य मंगल कार्यालय
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २३७ वा | मंगळवार, दि. २९ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# कॉंग्रेसच्या साथीनं स्वतःच्याच आमदारांना चारली पराभवाची धूळ

## सोलापूर बाजार समितीत अखेर माने-कल्याणशेट्टी-हसापुरे पॅनेलची बाजी

### ■ 13 जागांवर दणदणीत विजय

### ■ देशमुखांना तीन जागा, दोन अपक्ष विजयी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत सोसायटी मतदारसंघातील तब्बल 11 जागांच्या बळावर भाजप आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार दिलीप माने, सुरेश हसापुरे यांच्या पॅनेल सत्ता मिळविण्यात पुन्हा एकदा यशस्वी ठरला आहे.

ग्रामपंचायत मतदारसंघात सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलने तीन जागा जिंकून प्रथमच बाजार समितीत खाते उघडले आहे. मात्र, सत्ता मिळविण्यात देशमुखांना पुन्हा एकदा अपयश आले आहे.

माने-कल्याणशेट्टी-हसापुरे पॅनेलने सहकारी संस्थांतील अकरा, ग्रामपंचायतमधील एक आणि हमाल तोलार मतदारसंघातील एक अशा तेरा जागा जिंकत विजय मिळविला आहे. विरोधी सुभाष देशमुख गटाला तीन जागांवर समाधान मानावे लागले आहे, व्यापारी मतदारसंघातून दोन अपक्ष उमेदवार निवडून आले आहेत.

मागील 2017 च्या निवडणुकीतही सुभाष देशमुख हे विरोधातच होते. त्यांच्या विरोधात भाजपचे विजयकुमार देशमुख, दिलीप माने, सुरेश हसापुरे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे बळीराम साठे यांचे पॅनेल होते. मागील निवडणुकीत देशमुख, दिलीप माने, साठेंच्या पॅनेलने सर्वच सर्व जागा जिंकल्या होत्या. सुभाष देशमुख यांच्या पॅनेलला एकही जागा मिळालेली नव्हती. यावेळी मात्र त्यांनी ग्रामपंचायत मतदारसंघातील तीन जागा जिंकून बाजार समितीत एन्ट्री केली आहे.

आमदार तथा भाजपचे जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी यांनी कॉंग्रेसचे माजी आमदार दिलीप माने, सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे यांना सोबत घेऊन बाजार समितीची निवडणूक लढवली. भाजपचे आमदार सुभाष देशमुख यांनी मात्र कॉंग्रेससोबतची युती मान्य नसल्याचे सांगून बाजार समितीसाठी स्वतंत्रपणे दंड थोपटले होते. सोसायटी मतदारसंघ हा दिलीप माने आणि सुरेश हसापुरे यांचा बालेकिल्ला मानला जातो, त्या बालेकिल्ल्याच्या जोरावरच ही जोडगळी आतापर्यंत बाजार समितीत बाजी मारत आली आहे. या वेळी पुन्हा तेच झाले आहे.

सहकारी संस्था मतदारसंघातून कल्याणशेट्टी, माने आणि हसापुरे यांच्या पॅनेलचे सर्वच सर्व ११ उमेदवार निवडून आले आहेत. त्यांनी विरोधकांना सरासरी एवढ्या ८०० मतांच्या फरकानी मात दिली आहे. सोसायटी मतदारसंघातून विरोधी सुभाष देशमुख यांच्या पॅनेलच्या उमदेवारांना तीन आकडी संख्याही गाठता आलेली नाही, त्यामुळे बाजार समितीला दंड थोपटणाऱ्या देशमुखांना सहकारी संस्था मतदारसंघातून मात देण्याची कला माने यांनी आत्मसात केलेली आहे.

सहकारी संस्था गटातील कल्याणशेट्टी, माने आणि हसापुरे यांच्या पॅनेलचे विजयी उमेदवार व त्यांना मिळालेली पुढीलप्रमाणे :

- दिलीप माने : १३६१
- सुरेश हसापुरे : १३५५
- राजशेखर शिवदारे :१३६६
- श्रीशैल नरोळे : १२४४
- उदय पाटील : १२८३
- प्रथमेश पाटील : १२७१
- नागप्पा बनसोडे : १२८०

**सहकार संस्था महिला राखीव गट**

- इंदुमती अलगोंडा : १३२७
- अनिता विभुते : १२८८

**सहकार संस्था इतर मागास वर्ग**

- अविनाश मार्तंडे : १३४५

**सहकार संस्था विमुक्त जाती-भटक्या जमाती**

- सुभाष पाटोळे : १२४३

ग्रामपंचायत गटातून सुभाष देशमुख यांच्या पॅनेलचे तीन उमेदवार विजयी झाले आहेत. त्यात देशमुखांचे चिरंजीव मनीष देशमुख २१६ मतांनी, रामप्पा चिवडशेट्टी १९५ मतांनी तर अतुल गायकवाड हे ७१ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांना मिळालेली मते पुढील प्रमाणे

**ग्रामपंचायत मतदारसंघ (देशमुख पॅनेल)**

- मनीष देशमुख (636)
- रामप्पा चिवडशेट्टी ( 615)

**ग्रामपंचायत मतदारसंघ राखीव**

- अतुल गायकवाड (५८९)

**कल्याणशेट्टी, माने, हसापुरे पॅनेल**

- सुनील शेळके (५७०)

कल्याणशेट्टी, माने हसापुरे पॅनेलचे सुनील शेळके हे ३४ मतांनी निवडून आले आहेत. त्यांना एकूण ५७० मते पडली आहेत. मात्र ग्रामपंचायत मतदारसंघातून संगमेश बगले (472 मते), तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांना (420 मते,) तर सुभाष देशमुख यांच्या पॅनेलचे यतीश शहा यांचा ३४ मतांनी पराभव झाला आहे.

## सोलापूर आणि सांगली जिल्ह्यात अवकाळी पावसाची हजेरी; पिकांचे मोठे नुकसान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरासह जिल्ह्यात यंदाच्या उन्हाळ्यातील सर्वाधिक तापमान नोंदवले असतानाच काल संध्याकाळनंतर अवकाळी पावसानं हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. रस्त्यावर वाहतूक खोळंबली, तर काही ठिकाणी विजेच्या लपंडावामुळे अडचणी निर्माण झाल्या.

गेल्या आठवडाभरात सोलापूर शहर व जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिके व फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही भागांत काढणीच्या अंतिम टप्प्यात असलेल्या गहू, हरभरा, डाळिंब, द्राक्ष अशा पिकांवर पावसाचा मोठा फटका बसला आहे. शेतकरी वर्गात त्यामुळे चिंता वाढली आहे.

दरम्यान, सांगली जिल्ह्यातील तासगाव आणि मिरज तालुक्यात काल दुपारी मेघगर्जनेसह पावसाने हजेरी लावली. दिवसाच्या उकाड्यानंतर आलेल्या या पावसामुळे हवेत काहीसा गारवा निर्माण झाला, मात्र काही ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे झाडे कोसळल्याच्या घटना नोंदवण्यात आल्या आहेत.

हवामान विभागाने पुढील काही दिवस सोलापूर व आसपासच्या भागात हलक्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'स्मार्ट सिटी' बरोबरच 'स्मार्ट गावे' ही झाले पाहिजेत - खा. प्रणिती शिंदे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी आज अक्कलकोट तालुक्यातील आळगे या गावी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधून तुम्ही मला खासदार म्हणून निवडून देऊन सेवेची संधी दिली त्याबद्दल आभार, स्मार्ट सिटी बरोबरच स्मार्ट गावे झाले पाहिजेत यासाठी आपला प्रयत्न राहील. आळगे गावाच्या मैदान, रस्ते, रेशन धान्याची समस्या, अपंगांचे प्रश्न आदी मूलभूत सोयीसुविधांचे प्रश्न सोडविण्याची, आणि आळगे गावाचा आणि अक्कलकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही यावेळी दिली.

तसेच ग्रामस्थांचे निवेदने ही स्वीकारून त्यांच्या अडचणी लवकरात लवकर सोडविणार असल्याचे सांगितले.

यावेळी ऊ.बा.ठा. शेतकरी सेनेचे तालुका अध्यक्ष महांतेश हत्तुरे, सरपंच सुगलाबाई हत्तुरे, ऊ.बा.ठा. शिवसेना तालुका अध्यक्ष आनंद बुक्कानुरे, महादेव पाटील, बसवराज पाटील, उमेश क्याता, निजाम कुमठे, यासीन कुमठे, वन्नप्पा कोळी, सिद्धाराम कोळी, रियाज मुल्ला, अरविंद कुलकर्णी, मलकारी पुजारी, शरणबसप्पा माळगे, रुकुमोद्दीन कुमठे, वजीर बाशा कुमठे, धर्मराज मांग यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला व तरुण मित्र बहुसंख्येने उपस्थित होते.

## 'शक्तिपीठ'च्या विरोधात बार्शीत शेतकऱ्यांचे प्रांताधिकाऱ्यांसमोर 'लोटांगण'



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातून जाणाऱ्या नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाला जमिनी देण्यास शेतकऱ्यांचा विरोध कायम आहे. त्याचाच भाग म्हणून बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी जमिनी देण्यास विरोध करीत चक्क प्रांताधिकाऱ्यांसमोर लोटांगण घातले.बार्शीचे प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे यांनी शक्तिपीठ मार्गासाठी जमिनी संपादन करण्याच्या अनुषंगाने बाधित शेतकऱ्यांची बैठक बोलावली होती.

उपस्थित शेतकऱ्यांनी जमीन देणार नाही, असा आक्रमक पवित्रा घेत बैठक उधळून लावली. यावेळी सर्व शेतकऱ्यांनी प्रांताधिकारी पडदुणे यांच्यासमोर लोटांगण घालून शासन व प्रशासनाच्या कार्यवाहीचा निषेध नोंदविला. शक्तिपीठ महामार्ग रद्द झाला पाहिजे, शेती आमची-हक्क आमचा, भूमिपुत्रांना उद्ध्वस्त करू नका, अशा घोषणांनी बैठकीतील वातावरण तापले होते. त्यामुळे अखेर बैठकीतील चर्चा फिस्कटली.

सोलापूर जिल्ह्यात बार्शीसह उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर व सांगोला या पाच तालुक्यांतील १५६ किलोमीटर लांबीसाठी नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाकरिता जमिनी संपादित केल्या जात आहेत. एकट्या बार्शी तालुक्यातील गौडगाव, रुई, रातंजन, जवळगाव, मालेगाव, आंबेगाव, शेळगाव आर आदी गावांतील शेतकऱ्यांची ६५० एकर जमीन संपादित होणार आहे.

नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गासाठी लोकांची मागणी नसतानाही हा महामार्ग तयार करण्याचा अट्टाहास शासनाकडून होत आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून त्यांच्या जमिनी संपादित करणे, हे अन्यायकारक आहे. शेतकऱ्यांचा विरोध डावलून शक्तिपीठ महामार्ग तयार करण्याच्या निर्णयाचा शासनाने फेरविचार करावा, अशी मागणी यावेळी शेतकऱ्यांनी केली. शासनाने आपला निर्णय कायम ठेवल्यास त्या विरोधात राज्यव्यापी आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही शेतकरी संघटनांनी दिला आहे.

## परदेशात शिक्षण शिष्यवृत्ती साठी १७ मे पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) मधील विद्यार्थ्यांसाठी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेंतर्गत १७ मे २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाने केले आहे.

या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पी एच डी अभ्यासक्रमासाठी दर (Quacquarelli Symonds) रँकिंग २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये प्रवेश घेतला असेल अथवा प्रवेश घेतील अशा ७५ विद्यार्थ्यांना दरवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. या शिष्यवृत्तीसाठी शाखानिहाय / अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध आहेत. परदेशी शिष्यवृत्तीसाठी अजार्चा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्त्वाचे अटी व शर्ती इत्यादी सविस्तर माहितीसाठी विभागाच्या https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळला भेट द्यावी.

**योजनेच्या अटी व शर्ती**

योजनेच्या अटी व शर्ती नुसार विद्यार्थी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवासी असावा. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नसावे. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएच.डी. साठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे सन २०२४-२५ चे एकत्रित वार्षिक उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त नसावे. विवाहित महिला उमेदवारांसाठी पतीकडील कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न दाखविणे आवश्यक आहे. जर अर्जदार स्वतः किंवा अर्जदाराचे आई वडील विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, पती/पत्नीपासून विभक्त राहत असल्यास कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. महिला उमेदवार विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत किंवा पतीपासून विभक्त असल्यास जर वडिलांकडे वास्तव्यास असेल तर वडिलांकडील कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न दाखविणे आवश्यक आहे, शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव असतील. परदेशातील शिक्षण संस्थेत प्रवेश घेणाऱ्या वा प्रवेशित असलेल्या प्रथम, व्दितीय व तृतीय वषार्तील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येईल; परंतु व्दितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना पूर्ण केलेल्या अभ्यासक्रम कालावधीची शिष्यवृत्ती अनुज्ञेय असणार नाही. एका कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल. त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. यासाठी पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी तसे प्रतिज्ञापत्र करुन देणे बंधनकारक असेल. एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटुंबातील दोन पाल्यांचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहिल्यास एका कुटुंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल. तसेच सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही. भारतातील मान्यता प्राप्त विद्यापीठांमधून पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी पदवी परीक्षेत व पीएचडी साठी पदव्युत्तर परीक्षेत किमान ५५ टक्के गुण असणे आवश्यक आहे. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतिक क्रमवारीत (QS World University Rank) २०० च्या आत असावी, (सन २०२५ ची दर Ranking).

**या ठिकाणी अर्ज सादर करा:-**

इच्छुक विद्यार्थ्यांनी www.maharashtra.gov.in किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (पान 2 वर..)

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन

डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu ).,P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दैनिक सोलापूर www.katusatya.in
कटूसत्य मुख्य कार्यालय
संपादक पांडूरंग हरिदास सुरवसे
उपसंपादक सचिन मोहन जाधव
सोलापूर वृत्तदर्पण न्यूज चॅनल
पत्ता :- वृंदावन पार्क, होटगी रोड सोलापूर, फोन : ०२१७-२६०५०९१, ०२१७३५५०५९२, मो. ९६५७०६९०६९, मो.९७६५३९०३३९

आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

आपणही "मुक्त पत्रकार" होवून समाजात मानसन्मान व प्रामाणिकपणे काम करुन प्रामणिक पैसे कमवू शकता. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, ग्रामपंचायत सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक "मुक्त पत्रकार" होवू शकतो.

या संधीचा लाभ घेण्यासाठी आपण १०००/- रूपये भरून वार्षिक वर्गणीदार (सभासद) होणे आवश्यक आहे. वार्षिक वर्गणी भरणाऱ्यास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपली किंवा आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) इतकी जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक "कटूसत्य" या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून, दैनिक सोलापूर कटूसत्य या नावानी चेक/डी.डी.किंवा Daily Solapur Katusatya, Lokmangal Co-Op Bank LTD., Solapur, AC:- 0020011120001265, IFSC:- IBKL0478LOK या खात्यावर आपली रक्कम ऑनलाईनद्वारे जमा करून वर्गणीदार व्हा. आणि "मुक्त पत्रकार" होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. आणि रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, भारतीय असल्याचा पुरावा आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठवा. म्हणजे या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

नियम व अटी:- १) आपण आपली संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल मध्ये "मुक्त पत्रकार" म्हणून ओळखपत्र पाठविले जाईल. २) "मुक्त पत्रकार" मुळ ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल व इतर खर्च २००/- रूपये आपणास द्यावे लागतील. (कार्यालयात येवून हे सर्व साहित्य घेऊन गेल्यास पोस्टल खर्च घेतला जाणार नाही.) ३) सहा महिन्या नंतर "मुक्त पत्रकार" म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ४) आपण सर्व प्रकारच्या बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार दैनिक 'कटूसत्य' व 'वृत्तदर्पण' न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले जातील. ५) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही गावातील, शहरातील किंवा महानगरातील व्यक्ती "मुक्त पत्रकार" म्हणून काम करू शकतो. ६) आपल्या वृत्तपत्र व न्यूज चॅनलच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या (जमा केलेल्या) रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ७) या योजनेत सहभागी होवून कमिशनच्या स्वरूपात पैसे कमावण्याची संधी आहे. ८) आमचे "मुक्त पत्रकार" झाल्यानंतरच आपल्या जाहीराती स्वीकारल्या जातील व आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ९) कोणत्याही जाहिरातची संपूर्ण रक्कम जमा केल्याशिवाय जाहिरात प्रसिद्ध किंवा प्रसारीत केली जाणार नाही. १०) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ११) मग...! चला तर, आजच "मुक्त पत्रकार" होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

आपला विश्वासू
सपादक दै.सा.कटूसत्य

टिपः- "कटूसत्य" व "वृत्तदर्पण" या समुहात आपले स्वागत. आपण आणखीन काहीजणांना आपल्या समुहात सामील कराल अशी अपेक्षा.

## संपादकीय

# शांततेचे भय

हिंसाचार करणाऱ्यांना त्यांचे मनसुबे साध्य करायचे असतात. सततच्या ब्रेन वॉशमुळे ते एवढे हिंसक झालेले असतात, की त्यांना शांतता मानवत नाही. जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये जे झाले त्याचे हे ठळक उदाहरण.

हल्ल्यामागे कोण आहे याची भारताला आणि जगाला कल्पना आहे. ज्यांनी हे हल्लेखोर पोसले ते डोळे मिटून दूध पिण्याचा लाख आव आणत असले, तरी हिंसाचाराची त्यांनी लावलेली आग त्यांच्या स्वतःच्या मागच्या दारापर्यंत पोहोचली आहे याचेही त्यांना भान राहिलेले नाही. जेव्हा एखादा रोगी पछाडतो तेव्हा त्याला त्याच्या स्वतःच्या भल्याबुऱ्याचीही खबर राहिलेली नसते व अखेर तो आत्मघात करून घेतो.

भारताबद्दल गंड असणाऱ्यांचा अंतही असाच होणार आहे. शत्रू तुमच्याबद्दल काय विचार करतात ते त्याच्यावर सोडावे. तथापि, भारतातील लोकांनी व या विशिष्ट हल्ला प्रकरणात काश्मिरींनी काय विचार करावा हे त्यांनी ठरवले पाहिजे. पहलगामचा हल्ला हा केवळ भारताच्या श्रद्धेवर आणि आत्मविश्वासावर हल्ला नाही, तर तो काश्मीरवर आणि त्यांच्या अभिमानाने गौरवल्या जाणाऱ्या काश्मिरीयतवरही आहे. हा हल्ला काश्मीरला पुन्हा एकदा जुन्या अंधकाराच्या युगात घेऊन जाण्याची शक्यता आहे. त्याला रोखणे आणि आवर घालणे हे त्यांच्याच हाती आहे.

हे सांगायचे कारण म्हणजे पर्यटकांवर हल्ला झाला तेव्हा त्यांना धीर देणारे, त्यांना वाचवण्यासाठी पुढे सरसावणारे काश्मिरी होते हे बातम्यांमधून समोर आले आहे. मात्र, त्याचवेळी सीमेपलीकडून आलेल्या हल्लेखोरांना मदत करणारेही स्थानिकच होते हेही समोर येत आहे. दहशतवाद्यांनी धर्म अथवा मृत्यू पश्चातच्या कथित सुंदर जगाचे आमिष दाखवून जी मोजकी टाळकी भडकावली त्यांनी हा हल्ला करणाऱ्यांना मदत केली. हे करताना त्यांना याची किंचितही जाणीव झाली नाही, की असे करून ते आपल्याच लोकांच्या आणि आपल्या स्वतःच्या पोटावर लाथ मारून घेत आहेत.

मंगळवारच्या हल्ल्यानंतर देशभरातून काश्मीरला जाऊ इच्छिणाऱ्यांकडून बुकिंग रद्द करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत कुटुंबासमवेत जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश जाण्याचे अनेकांचे नियोजन होते. या लोकांनी तेथील हॉटेल्स, गाड्या आणि विमानांचे बुकिंग अगोदरच केले होते. ते आता रद्द केले आहे. रद्द करण्याचे हे प्रमाण पहिल्या 24 तासांतच 30 टक्के होते. पर्यटन हाच पृथ्वीवरील नंदनवन म्हणवल्या जाणाऱ्या काश्मीरचा आर्थिक कणा आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, काश्मीरला या पर्यटन उद्योगातून वर्षाकाठी 12 हजार कोटी रुपये मिळतात. पुढील पाच वर्षांत हे उत्पन्न 25 ते 30 हजार कोटी रुपयांपर्यंत जाण्याचे अनुमान आहे.

केंद्रशासित प्रदेश केल्यापासून येथे येणाऱ्यांच्या संख्येत वाढच होत गेली. 2020 मध्ये केवळ 36 लाख पर्यटकांनी काश्मीरला भेट दिली होती, मात्र पुढच्याच वर्षात हा आकडा सव्वाकोटीपर्यंत पोहोचला. 2024 च्या आकडेवारीनुसार या वर्षात 2 कोटी 36 लाख पर्यटकांनी काश्मीरला भेट दिली व यात विदेशी पर्यटकांची संख्या 65 हजार होती. याच पर्यटकांच्या भेटीतून तब्बल अडीच लाख स्थानिकांना रोजगार मिळतो. पहलगामच्या घटनेनंतर या सगळ्यांचा रोजगार धोक्यात आला आहे. त्यांच्यापुढे उदरनिर्वाह कसा करायचा याचे संकट उभे राहणार आहे.


जम्मू काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम 370 रद्द केल्यानंतर काश्मीर कात टाकत असल्याचे आणि खरेच हे नंदनवन पुन्हा फुलते आहे असे संकेत देणाऱ्या अनेक घटना घडत होत्या. लक्षवेधी हिंसाचाराच्या काही घटना घडल्या; मात्र एकुणात हॉटेलपासून नव्या वाहनांच्या खरेदीपर्यंत प्रत्येक क्षेत्रातील आकडेवारी काश्मीरच्या चांगल्या भवितव्याची ग्वाही देत होती. काश्मीरमध्ये 2017 मध्ये 14.88 लाख नव्या वाहनांची नोंदणी केली गेली होती. 2024 मध्ये हीच संख्या दुप्पट म्हणजे 27.29 लाखांपर्यंत गेली. दहशतवादाचा काळा कालखंड सुरू झाल्यापासून सामान्य पर्यटकांपासून चित्रपट निर्मात्यांकडून काश्मीरकडे पाठ फिरवली गेली होती.

ते चित्रही गेल्या काही महिन्यांत बदलत चालले होते. येथील पर्यटन उद्योग असाच वाढत जावा यासाठी केंद्र सरकारनेही 1 हजार कोटी रुपयांचे विशेष पॅकेज दिले होते. राज्य सरकारच्या एकूण उत्पन्नात या उद्योगातून मिळणारा वाटाच सगळ्यांत मोठा होता. या सगळ्याला एका हल्ल्याने गालबोट लावले आहे. काश्मीर ही आमच्या गळ्याची नस आहे आणि राहील अशी दर्पोक्ती पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी चार-पाच दिवसांपूर्वीच केली होती. त्यानंतर भारतात हल्ला झाला आहे. त्यांच्या बलुचिस्तान प्रांतात तेथील बंडखोरांनी चक्क रेल्वेचे अपहरण करून कथित सक्षम पाकिस्तानी लष्कराच्या अब्रूचे धिंडवडे उडवल्यानंतर लष्करप्रमुखांना ही फुशारकी मारण्याची वेळ आली. भारताशी कायम शत्रुत्व भाव जोपासर्णाया शेर्जायांकडून आपण प्रेमाची आणि बंधुभावाची अपेक्षाही करू शकत नाही. वैषम्य एकाच गोष्टीचे आहे की त्यांच्या या नापाक इराद्यात त्यांना आतल्याच काही गद्दारांनी रसद पुरवली आहे. घरातील घाण बाहेर टाकण्यासाठी प्रत्येक घरात व्यवस्था केली जातेच. मात्र, त्याच व्यवस्थेचा लाभ घेत बाहेरची घाण आत येऊ लागली की ते धोकादायक असते. सर्वच काश्मिरी वाईट नाहीत आणि नव्हतेही. फक्त त्यांच्यातील काही भ्रमिष्ट आणि अपरिपक्व मडकी तापदायक आहेत.

सरकार आणि लष्कर त्यांना हुडकून काढेल आणि न्याय करेलच. तथापि, पर्यटकांच्या हल्ल्याच्या वेळी जे काश्मिरी मदतीसाठी पुढे सरसावले त्यांनी एरव्हीही दक्ष राहून वेळोवेळी पुढाकार घेणे गरजेचे आहे. ज्यांना शांततेच्या विचारानेही भय वाटते ते काश्मीरमधील शांतता भंग करण्याचाच प्रयत्न करतील. मात्र, यात परवड सर्वसामान्य काश्मिरींचीच होईल हे सगळ्यांत प्रथम काश्मिरींनी लक्षात ठेवावे.

# मोबाईलने बालपण हिरावून; मानवी दिनचर्येवर घणाघाती प्रहार केला

आपण म्हणतो बालपण देगा देवा! परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गासाठी घातक सिद्ध होत.त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुध्दा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोरं येतांना दिसत आहे. एक वर्षावरील मुलं रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात. याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे. ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते. यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे.देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात.स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते.आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही,घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही कारण एक वर्षाच्या मुलांपासून ते मोठ्या पर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अतिलाडामुळे चिमुकले सुध्दा मोबाईलच्या आहारी गेले आहेत.यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थ्यांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते. स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो. परिणामी, मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे. यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. देशात ७४ टक्के मुले (११ ते १७ वयोगटातील) रोज ३० मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे १६ ते ३४ वयोगटातील ५९ टक्के लोक ऑनलाईन खेळ ३-३ तास खेळण्यात मग्न असतात.म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही.डब्लुएचओच्या रिपोर्ट नुसार भारतात ११ ते १७ वयोगटातील ७४ टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे.म्हणजेच एका आठवड्यात मुलं १५० मिनिटसुध्दा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पध्दतीने पाहिजेत त्या पध्दतीने दिसून येत नाही.यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील ४१ टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो. यामुळे शरिराला ज्या पध्दतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे.आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात मोबाईल शिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे याला कोणीही नाकारू शकत नाही.म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीध्द होवू शकते यालाही नाकारता येत नाही. मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते.स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा ॲटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन ॲटॅक असेही म्हणतात.देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास ६५ लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते.म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते. ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार, मानेचा त्रास, मानसिक त्रास, हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही.त्यामुळे ही कठीण परिस्थिती उध्दभवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही यापध्दतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा." अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षाच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे. चार वर्षापेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे. यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात. आपण काय करायचं आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तू पासून दुर राहु शकतो.आज आपण पहातो ३ ते २० वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चीपकुन रहातात. जनुकाय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते.याचा दुष्परिणाम पुढेचालुन भयानक होवू शकतो. छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात परंतु हे घातक आहे.त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाइल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल एक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल.मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुध्दा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांणा मोबाईलवर बोलत रहातात यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हाणी सुध्दा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही.परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे.अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो. त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दुःख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बुध्दीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत.त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे.आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उध्दभवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी, युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थांना शारिरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते. यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते "कहा गये ओ दिन"



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# रंग जीवनाचा । मुलांच्या ववावा

शिक्षणाच्या एका व्याख्येनुसार बालकाचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण असं जरी म्हटलं गेलं, तरी 'लक्षात कोणुघेतो' अशीच या व्याख्येची स्थिती आहे. बालकाच्या सर्वांगीण विकासाचा विचार पालकांच्या मनाला स्पर्श करून जात असेल, पण शिक्षण एके शिक्षण किंवा अभ्यास एके अभ्यास या चाकोरीबाहेर पालक जाऊ शकत नसतील, तर बालकाचा सर्वांगीण विकास होणार कसा? युनेस्कोने बालहक्कांचा जो जाहीरनामा प्रसिद्ध केलाय, तो आजही दुर्लक्षितच आहे. वास्तविक, सम्राट अशोक याने जसे शिलालेख उभे केले, त्याप्रमाणे बालहक्कांचा मजकूर असलेले फलक सर्व शाळांच्या प्रवेशद्वारी लावले गेले पाहिजेत. बालहक्कांचा जाहीरनामा सांगतो-

'प्रत्येक बालकाला त्याचा स्वतःचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक, आत्मिक व सामाजिक विकास साधता येण्यासाठी आवश्यक ती संधी व साधनं उपलब्ध करून दिली जातील व त्यासाठी त्याला खास संरक्षणही मिळेल. त्याच्या स्वातंत्र्याची जपणूक केली जाईल.'

'प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण सक्तीचं आणि मोफत मिळालं पाहिजे. प्रत्येक बालकाला त्याचा खेळण्याचा व करमणुकीचा प्राथमिक हक्क बजावण्याची संधी प्राप्त करून दिली जाईल. तो समाजाचा जबाबदार नागरिक बनत आहे, हे पाहाणं ही समाजाची व पालकांची जबाबदारी राहील.'

वरील बालहक्कांचे स्वरूप Work while you work and play while you play उक्तीतून प्रकट होतेच. मात्र शाळांनी जसं मुलांच्या सर्वांगीण विकासाकडे दुर्लक्ष केलं आहे, त्याप्रमाणे मुलांच्या आई-वडिलांनीसुद्धा मुलांच्याकडे नीट लक्ष दिलेलं नाही, असंच चित्र सर्वत्र दिसतं. वास्तविक, घरातलं मूल हा घराचा भविष्यकाळ आहे. पण आपलं मूल परीक्षेच्या त्रासातून मुक्त झालं म्हणून आपण आपल्या कामाधंद्यातून शक्य तितकी सवड घेऊन त्या मुलाच्या आवडीच्या ठिकाणी जाणं, राहाणं, तेथे त्याला मुक्तपणे खेळू देणं, त्याच्या खेळात आई-बाबा, अथवा धट्टेकट्टे असतील तर आजी-आजोबांनीही सहभागी होणं, हे व्हायला हवं. मात्र असं किती कुटुंबांत घडतं? बाबा जर आपल्या हडेलहप्पी स्वभावाला मुरड घालायला तयार नसतील, तर मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर येणारी बंधनं सैल कशी होणार? मुलांना खेळण्याचीसुद्धा सक्ती केली गेली पाहिजे, हे आम्ही कधी लक्षात घेणार?

माणूस हा कोणत्याही सवयींचा गुलाम फार लवकर होतो, ही साधी मानसशास्त्रीय बाब आहे. पण ही जाणीव किंवा सुज्ञपणा बऱ्याच पालकांमध्ये नसतो. वडील जर क्रिकेटचे भोक्ते असतील, तर ते आता नेहमीचेच होऊन बसलेलं एक दिवशीय क्रिकेट पाहाण्यात सवयीनेच गुरफटून जातील. आय. पी. एल हा तर क्रिकेटचा महोत्सवच मानला जात आहे. आमचे पालक या महोत्सवाकडे निग्रहाने पाठ फिरवून आपल्या बछड्याकडे थोडं तरी लक्ष देऊ शकले, तरच ते खरे पालक! म्हणूनच आपलं मूल बालवर्गात आहे की सीईटीची तयारी करत आहे, याचा विचार परीक्षेपुरता मर्यादित ठेवून त्या मुलाला खेळ, करमणूक, देशदर्शन इत्यादीद्वारे आनंदित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तरच त्याच्या परीक्षेचा ताण, अभ्यासाचं ओझं, गुणवत्तेच्या प्राप्तीची चिंता याखाली दबलेल्या चित्तवृत्ती प्रफुल्लित होतील. क्रिकेटचं वेड पालक उद्याही जोपासू शकतील. पण आपल्या मुलाचं आज हरवलेलं बालपण ते कधीही, कोणतीही किंमत देऊन परत आणू शकणार नाहीत. म्हणून पालकांनी बालकांचं मन प्रफुल्लित करण्याच्या प्रत्येक प्रयत्नात स्वतःलास्वतःला झोकून दिलं पाहिजे.

खलील जिब्रान हा उदारमतवादी, मानवतावादी विचारवंत म्हणतो, 'तुमची बालकं ही तुमची बालकं नव्हेत, तर चिरंजीव होऊ इच्छिणाऱ्या जगज्जीवनाच्या उत्कट कामनेचे ते कन्या-पुत्र आहेत. तुम्ही त्यांना आपलं प्रेम द्या, पण आपले विचार देऊ नका. कारण त्यांना स्वतःचे विचार आहेत. शरीरासाठी तुम्ही त्यांना घरं बांधून द्या, पण त्यांच्या आत्म्याकरिता मात्ती देऊ नका. कारण आत्मे तुम्हाला बघता न येणाऱ्या भविष्याच्या मंदिरात राहातात. '

वैद्यकक्षेत्रात शस्त्रक्रियेनंतर घेण्याची खबरदारी फार महत्त्वाची मानली जाते. परीक्षेचा ताण ही मेंदूची शस्त्रक्रिया मानली, तर त्या तणावातून मुक्त झालेल्या आपल्या मुलाला जपण्याचं काम हे महत्त्वाचं मानलं पाहिजे. म्हणून जे पालक आपल्या मुलामुलींसाठी वेळ आणि पैसा खर्च करण्यासाठी तत्पर असतील, तेच आपल्या घराचा भविष्यकाळ उज्ज्वलुकरतील. दुर्दैवाने आमच्या नव्या पिढीच्या वाट्याला येणारे बरेच पालक भाग्यवादी आहेत. आपल्या मुलांचा सर्वांगीण विकास आपण घडवू शकतो, अशी जिद्द त्यांनी बाळगली तर घर, समाज, राष्ट्र सुदृढ व्हायला वेळ लागणार नाही. त्यासाठी-

बालकात पाहा। भविष्य राष्ट्राचे
घराच्या सुखाचे। उगमस्थान ॥ १
मन - शरीराने। निरोगी बालक
धन्य ते पालक । जन्मदाते ॥२
आईच्या कष्टाने । बाळे वाढतात
ज्ञानाने व्हावीत । सुदृढ ती ॥३
पुस्तकी ज्ञानाला । मानू नका पूर्ण
खेळानेही मन । दृढ होते ॥४
पालकांनी व्हावे। मुलामध्ये मूल
भरपूर वेळ । द्यावा त्यांना ॥५
रंग जीवनाचा। मुलांच्या वाढवा
आनंद साठवा । काठोकाठ ॥ ६
आनंदी ठेवते। घर जे बाळांना
समृद्धी उधाणा । तेथे येई ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

## परदेशात शिक्षण शिष्यवृत्ती साठी

अर्ज डाउनलोड करावा. हा अर्ज परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रांसह १७ मे २०२५ पर्यंत सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला, एम एच बी कॉलनी, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स समता नगर, येरवडा पुणे ४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा.

**योजनेच्या लाभाचे स्वरूप:-**

परदेशातील शैक्षणिक संस्थेने अन्कंडीशनल ऑफर लेटरमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक कालावधीसाठी लागू केलेली संपूर्ण शिक्षण फी ही संबंधित यंत्रणेने थेट संबंधित शैक्षणिक संस्थेस अदा करावी. विद्यार्थ्यांस होणाऱ्या खर्चाचा भार हलका व्हावा म्हणून दरवर्षी यू.एस.ए. व इतर देशासाठी (यू.के. वगळून) १५०० यूएस डॉलर, आणि यू.के. साठी ११०० जीबीपी इतका निर्वाह भत्ता /इतर खर्च आकस्मिक खर्च म्हणून देण्यात येईल. विद्यापीठाच्या निकषानुसार वैयक्तिक आरोग्य विमा खर्च अनुज्ञेय असेल. भारत सरकारच्या नॅशनल ओव्हरसिज स्कॉलरशिप या योजनेच्या मार्गदर्शक सुचनांस अनुसरून दरवर्षी यू.एस.ए.व इत्तर देशांसाठी (यू.के. वगळून) १५४०० यू.एस. डॉलर्स आणि यू.के. साठी ९९०० जीबीपी इतकी रक्कम किंवा विद्यार्थ्यांस प्रत्यक्ष येणारा खर्च यापैकी कमी असणारी रक्कम अनुज्ञेय असेल, विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर भारतात परत येताना नजिकच्या मार्गाने (इकॉनॉमी क्लास) विमान प्रवासाचा खर्च अनुज्ञेय असणार आहे.

## वात्रटिका

### ऑनर किलिंग

निर्दयी बापाने लेकी वर
धाडकन गोळी झाडली...
स्तब्ध झाली नाती आणि
माणुसकी रडली...
प्रेमावर काल, आज सदाच
प्रतिष्ठेचे आक्रमण आहे...
दोन जीवांचा प्रेमात
तिसऱ्या जीवाचे मरण आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# टेंभुर्णीत सकल जैन समाजाचा आक्रोश मोर्चा

**टेंभुर्णी, (कटूसत्य वृत्त):-** मुंबई विलेपार्ले येथील जैन मंदिर बुधवार (दि.१६) एप्रिल रोजी बीएमसी प्रशासनाद्वारे पोलीस बंदोबस्तात पूजाअर्चा अभिषेक चालू असताना सर्व भक्तांना सक्तीने बाहेर काढून जेसीबी मशीन द्वारे उध्वस्त करण्यात आले. याच घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी टेंभुर्णी सकल जैन समाजाच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला. शहरातील आदिनाथ दिगंबर जैन मंदिर मारवाडी गल्ली शुक्रवार पेठ येथून टेंभुर्णी ग्रामपंचायत वेश येथून टिळक रोड मोर्चा काढण्यात आला मोर्चामध्ये टेंभुर्णी शहरातील आदिनाथ दिगंबर जैन मंदिर मारवाडी गल्ली शहर व परिसरातील जैन बांधवांनी सहभागी होऊन हातामध्ये फलक घेत

**आक्रोश मोर्चात घोषणा चालू होत्या..**

"डर के नहीं, डट के खडा है पुरा जैन समाज.. मंदिर वही बनायेंगे, आस्था को नहीं मिटायेंगे.. हम सब एक है. तभी तो जैन धर्म सेफ है.. मंदिर हमारी आस्था है, इसे नही मिटने देंगे.. जैन समाज छोटा है, ताकत उसकी बड़ी है... रुकेगे ना झुकेंगे, मंदिर वही बनायेंगे,

मंदिरावरील हल्ले थांबलेच पाहिजे.. साधू संतावर हल्ले थांबलेच पाहिजे.. तीर्थरक्षा, धर्म रक्षा.. झालीच पाहिजे

हम शांत है. कमजोर नही..

शांती आमचा स्वभाव आहे,

कमजोरी नाही..

पाडलेले मंदिर बांधून दिलेच पाहिजे.. आशा घोषणा पुनम शहा देत होत्या त्यांच्या पाठीमागे सर्व समाज घोषणा देत होता साधू सुरक्षित, समाज सुरक्षित...





विविध घोषणा देत घटनेचा निषेध नोंदवला.

मोर्चा मारवाडी गल्ली शुक्रवार पेठ चांदणी चौक टिळक रोड सोलापूर- पुणे राष्ट्रीय महामार्ग कुडूवाडी चौक, एसटी बस स्थानका पासून वळवून टेंभुर्णी पोलीस स्टेशन गेटवर आल्यानंतर सकल जैन समाजाच्या वतीने टेंभुर्णी पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.

टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या अनुपस्थित टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी निवेदन स्वीकारले निवेदन देता वेळी आदीनाथ जैन मंदीर अध्यक्ष सनदकुमार शहा, अजीतनाथ जैन मंदीर अध्यक्ष मनीष व्होरा, श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावकसंघ व सराफ व सुवर्णकार असोसिएशन चे अध्यक्ष महेश कोठारी, वर्धमान संघाचे उपाध्यक्ष गणेश सोनिग्रा, मदन शहा, विजयकुमार कोठारी नंदकुमार दोशी, वैभव गांधी, प्रसन्न शहा, नयन शहा, स्वप्निल धोका, मानीक कोठारी, विकास कोठारी, परीमल दोशी, महेश कोकीळ, प्रशांत गांधी, महावीर ओस्तवाल,पराग व्होरा, मुन्ना शहा, मनोज शहा, विरांग मेथा, स्वप्नील शहा, अतुल गांधी, संजय शहा, रत्नदीप भालेराव, अतुल चंकेश्वरा. बाळासाहेब सुराणा, दिलीप कोठारी, तसेच या मध्ये महीला सौ पुनम शहा, श्रेया व्होरा, भारती मेथा सौ सोनल शहा, अधिक महिला पुरुष यामध्ये सामील झाले होते टेंभुर्णी पोलीस स्टेशनला निवेदन दिल्यानंतर मोर्चेची सांगता झाली

# सा.बा.विभागाची गांधिगिरी - शिवसेनेने काढले झाड



**माढा (कटूसत्य वृत्त):-** माढा शेटफळ मार्गावरील गालिशी बाबा दर्ग्यानजिक असलेले झाड उन्मळुन पडल्याने वाहतुकीला अडचण निर्माण झाली होती.अखेर सा.बा.विभागाला शिवसेना शिंदे गटाचे नेते शंभु साठे यांनी झाड काढून गांधिगिरी दाखवली आहे. मागील तीन दिवसापूर्वी वादळी वाऱ्याने पिंपळाचे झाड पडले होते.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना नागरिकांनी झाड बाजूला काढण्याची मागणी केली होती. मात्र सा.बा.विभागाने दखलच न घेतल्यामुळे स्वखर्चाने जेसीबी मशीन व टॅक्टरद्वारे झाड बाजूला सारुन वाहतूक कोंडी थांबवली. या प्रसंगी शंभू साठे, आकाश कांबळे, पिंटू वाळके, शेखर कचरे, अतुल धुमाळ, संदीप साठे, वसंत पाटील, गौतम शिंदे आदी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# नातेपुते सह माळशिरस तालुका कडकडीत बंद



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ नातेपुते शहरात शिवसेना शिंदे गटाच्या वतीने तालुकाध्यक्ष सतीश सपकाळ यांचे नेतृत्वाखाली शनिवार दि. २६ एप्रिल रोजी पाकिस्तानच्या विरोधात भव्य निषेध मोचेर्चे आयोजन करून पाकिस्तानच्या राष्ट्रध्वजाची होळी करून पाकिस्तान मुर्दाबाद च्या घोषणा देण्यात आल्या होत्या व रविवार दिनांक २८ एप्रिल रोजी माळशिरस तालुका बंदची हाक शिंदे गटाचे शिवसेनाप्रमुख सतीश सपकाळ यांनी दिली होती. पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ नातेपुते सह माळशिरस तालुका कडकडीत बंद ठेवण्यात आला होता. शिवसेनेने पुकारलेल्या माळशिरस तालुका बंदच्या आव्हानास मोठा प्रतिसाद मिळाला. माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख सतीश सपकाळ व शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी नातेपुते शहरासह माळशिरस तालुक्यामध्ये फिरून दौरा केला व पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ माळशिरस तालुक्यातील सर्व जनतेने आपले आर्थिक व्यवहार बंद ठेवून कडकडीत बंद पाळला त्याबद्दल सतीश सपकाळ यांनी जनतेचे आभार मानले.

# ५ मे च्या दरम्यान टेंभूचे पाणी आटपाडी तलावातून माण नदीत दाखल होणार - दिपक साळुंखे पाटील



ना.राधाकृष्ण विखे पाटील



मा.आ. दिपकआबा साळुंखे पाटील

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** टेंभू योजनेतून सांगोला तालुक्यातील माण नदीला पाणी सोडावे आणि नदीवर असणारे सर्व बंधारे भरून द्यावेत या मागणीसाठी माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी नुकतीच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. यावर संबंधित विभागाला मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तत्काळ पाणी सोडण्याचे आदेश दिले आहेत.

टेंभू योजनेचे कार्यकारी अभियंता रेड्डीयार यांनी टेंभू योजनेनेचे पाणी ५ मे च्या दरम्यान आटपाडी तलावातून माण नदीत सोडण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिली.

सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतातील पिके जतन करण्यासाठी आणि दरातील पशुधन जतन करण्यासाठी शेतीच्या आणि पिण्याच्या पाण्याची चिंता भेडसावत आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नावर माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी नुकतीच राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली होती. गतवर्षी झालेल्या पावसाळ्यात अनियमित आणि अवेळी पाऊस झाल्याने चालू वर्षी उन्हाळ्यात भीषण पाणी टंचाई जाणवू लागली आहे. माण नदीच्या काठावर असलेल्या गावांना सध्या पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याने शेतातील उभी पिके, फळबागा जळून चालल्या आहेत. तर, दारात उभा असणारी जनावरे चारा आणि पाण्याअभावी टाहो फोडत आहेत. दरवर्षी उन्हाळी आवर्तनात टेंभूचे पाणी मान नदीत सोडण्याची मागणी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत मान्य केली असल्याचेही दिपकआबांनी आवर्जून स्पष्ट केले. सांगोला तालुक्यातील शेतीला आणि जनावरांना जीवनदान देण्यासाठी माण नदीत टेंभूचे पाणी सोडणे अत्यंत आवश्यक असल्याची मागणी लेखी निवेदनाद्वारे माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली होती. यावर मंत्री महोदयांनीही सकारात्मक प्रतिसाद देत तत्काळ टेंभूचे कार्यकारी अभियंता रेड्डीयार यांना आदेश दिले आहेत आणि रेड्डीयार यांनीही ५ मे च्या दरम्यान टेंभूचे पाणी आटपाडी तलावातून माण नदीत सोडून नदीवरील खवासपूर ते देवळे मेथवडे दरम्यान असणारे सर्व म्हणजे कोल्हापूर पद्धतीचे १५ बंधारे भरून देण्याचे आश्वासन दिल्याने सांगोला तालुक्यातील माण नदीकाठी असणारा शेतकरी आणि पशुपालकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# नातेपुते येथे पाकिस्तानच्या राष्ट्रध्वजाची होळी

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** पहलगाम हत्याकांडाच्या निषेधार्थ नातेपुते शहरात शिवसेना शिंदे गटाच्या वतीने तालुकाध्यक्ष सतीश सपकाळ यांचे नेतृत्वाखाली भव्य निषेध मोर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाकिस्तानच्या राष्ट्रध्वजाची होळी करण्यात आली. तत्पूर्वी पाकिस्तानच्या ध्वजावर लहान मुलांकडून लघु शंका करण्यात आली.

या निषेध मोर्चात शिवसेना शिंदे गट, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) व इतर सर्व राष्ट्रप्रेमी बहुसंख्येने हजर होते. येथील पुरातन श्री. राम मंदिरापासून शिवसेना तालुकाध्यक्ष सतीश सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली निषेध मोर्चा सुरू करण्यात आला.

प्रत्येकाच्या हातात भगवे ध्वज व समोर राष्ट्रध्वज होता. यावेळी पाकिस्तान मुर्दाबाद!! जय श्रीराम!! हर हर महादेव !! आदी घोषणा देण्यात येत होत्या.

निषेध मोर्चा चा समारोप लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात करण्यात आला. या ठिकाणी हनुमंतराव सूळ, किशोर पलंगे, महादेव तूपसुंदर, बादल सोरटे, सतीश सपकाळ आदींनी मनोगत व्यक्त केले. यानंतर या भ्याड हल्ल्यात धारातीर्थी पडलेल्या पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

पाकिस्तानी राष्ट्रध्वजावर लघु शंका करण्यात आली. आणि तालुकाध्यक्ष सतीश सपकाळ यांच्या हस्ते पाकिस्तानच्या ध्वजाची होळी करण्यात आली. नातेपुते पोलीस ठाण्याचे सपोनी महारुद्र परजणे यांना निषेधाचे निवेदन देण्यात आले.

यावेळी समीर शेख, राजाभाऊ कुडाळकर, वैभव शहा, माऊली उराडे, भीमराव पाटील, हनुमंतराव सूळ, धैर्यशील पांढरे, बादल सोरटे, विनोद रणदिवे, श्रीगणेश पागे, किशोर पलंगे, शशि कल्याणी, गिरीश पैठणकर, अमर भिसे, शिवसेना शहराध्यक्ष निखिल पलंगे, रुपेश इंगोले, अशोक शिंदे, अभिजीत चांगण, एकनाथ ननवरे, सनी पलंगे, व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रविवार ता.२७ रोजी माळशिरस बंदचे आवाहन शिवसेना शिंदे गटाच्या वतीने करण्यात आले आहे...
**- सतीश सपकाळ, तालुका अध्यक्ष**

# १ मे, कामगार दिनानिमित्त गुणवंत कामगार पुरस्कार सोहळ्याचे आयोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील व कामगार चळवळीतील अग्रणी नेते साहित्यरत्न कॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने 'गुणवंत कामगार पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन क्रांतीवीर लहुजी शक्ती सेना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहिती देताना प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी सांगितले की," मागील १७ वर्षापासून या दिनाचे औचित्य साधून गुणवंत कामगार पुरस्कार' संघटित आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांना संघटनेच्या वतीने दिला जात आहे. या कार्यक्रमाचे आयोजन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, सोलापूर येथील साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात होणार आहे. या कार्यक्रमास सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कॉ. रवींद्र मोकाशी, श्रीकांत बोराडे आदीच्या प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह, फेटा आणि सन्मानपत्र असे राहणार आहे. महानगरपालिकेतील विविध खात्यातील कर्मचारी, चादर- टॉवेल कारखान्यातील कामगार, बांधकाम कामगार आणि इतर शासकीय, अशासकीय आणि संघटित क्षेत्रातील १० कामगारांना या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येणार आहे."

# पालखीतील पादुकांचे दर्शन घेण्याचा बहाणा करून चांदीच्या पादुका चोरणारा गजाआड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री. संत बाळू मामा यांची पालखी मौजे व्होळे, ता. पंढरपूर येथे मुक्कामी होती. सदर पालखीमध्ये दीड किलो वजनाचे चांदीच्या श्री. संत बाळूमामा यांच्या पादुका होता. रात्रीच्या वेळी पालखीच्या संरक्षणासाठी रणजीत माने हे रखवालदार थांबले होते. रात्री 12/15 वा. च्या सुमारास एक चोरटा पालखीचे दर्शन घेणाचा बहाणा करून पालखीजवळ गेला. पालखीचे दर्शन घेवून पालखीतील दोन्ही पादका काढून रस्त्याच्या बाजूने पळत निघाला. परंतू रखवालदार माने यानी त्याचा संशय आला त्यावेळी त्यांनी आरडाओरड केला. लोकांनी पळून जाणारे इसमाचा अंधारात शोध घेतला परंतू तो चांदीच्या पादुकासह निघून गेला. त्याबाबत पालखीचे कारभारी यांनी दिलेल्या फियार्दीवरून करकंब पोलीस ठाणेस गु.र.नं 41/2025 भा.न्या.सं.क 303 (2) प्रमाणे गुन्हा दाखल होता.

या गुन्ह्याचा तपास करकंब पोलीस करत होते. यामध्ये करकंब पोलीसांना गोपनिय बातमीदाराने मौजे खरातवाडी येथील इसमन बालाजी खेला खरात हा मागील काही दिवसापासून चैनी करत असल्याची माहिती पुरवली. तेंव्हापासून पोलीसांनी त्याच्यावर नजर ठेवून माहिती काढली असता दिनांक 09 फेब्रुवारी 2025 रोजी व्होळे येथील पादुका यानेच चोरी केले असल्याची माहिती मिळाली. त्यास ताब्यात घेवून पोलीस अधिक विश्वासात घेवून तपास केला असता बाळू मामा यांच्या पालखीतील चांदीच्या पादुका चोरी केले असल्याची कबूली दिली. तसेच त्या पदुका या पंढरपूर येथील सोनाराकडे असल्याचे सांगितले. त्यावरून सदरच्या पादुका या हस्तगत करण्यात आलेल्या असून आरोपीस पोलीस कोडठी रिमांड घेण्यात आलेली आहे. त्याच्याकडे अधिक तपास सुरू आहे. सदरची कामगिरी ही अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, व अर्जुन भोसले, उपविभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर उपविभाग सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली सागर कुंजीर, प्रभारी अधिकारी, करकंब पोलीस ठाणे, पोसई निलेश गायकवाड, पोह बापूराव मो, पोह दत्तात्रय रासकर, पोह अभिजीत कांबळे यांनी केली आहे.

# महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेच राष्ट्रवादीने केले जल्लोषात स्वागत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने राष्ट्रीय अध्यक्ष राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे साहेब यांच्या मार्गदर्शनातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत यंदाच्या ६५ व्या महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे ते ४ मे दरम्यान गौरवशाली महाराष्ट्र महोत्सवाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने संपूर्ण राज्यातून काढण्यात येणाऱ्या मंगल कलश रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे .

पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे काल रात्री धरमपीठ नातेपुते येथे सोलापूर जिल्ह्यात प्रवेश झाला तेथे शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त यांनी स्वागत केले त्यानंतर माळशिरस, पंढरपूर, मंगळवेढा येथे ठिकठिकाणी मंगल कलश रथाचे स्वागत करण्यात आले आज 4 वाजता महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथ यात्रेचे सोलापूर शहरात आगमन झाले या रथाचे स्वागत सोलापूर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने ढोल ताशे गजरात दांड पट्टा तलवारबाजी लाठी काटी या मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक सादर करीत महीला पारंपरिक वेशात तसेच कार्यकर्ते भगवे फेटे निळ्या रंगाच्या टोप्या अल्पसंख्यांक समाजातील युवकांनी नमाजाची पांढरी टोपी सेवादलने गांधी टोपी परिधान करून सामाजिक सलोख्याचे अनोखा समतोल साधत मंगलमय वातावरणात फटाक्यांची आतषबाजीत करीत जोरदार जल्लोषात उत्साहात स्वागत केले ..

महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथामधील मंगल कलशाचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करून गुलाब पाकळ्यांची उधळण करीत स्वागत केले पश्चिम महाराष्ट्र रथ यात्रेचे प्रमुख लतीफभाई तांबोळी यांचा फेटा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला ....

या ठिकाणी सोलापूरच्या पावन भुमिचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर महाराज यांचे अभिषेक जल अक्कलकोट स्वामी समर्थ महाराज अभिषेक जल पद्मशाली समाजाचे आराध्य दैवत मार्कंडेय महामुनी अभिषेक जल भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शने पावन झालेली वळसंग विहिरीतील जल असे जल कलश स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे शहीद चार हुतात्मे यांच्या बलिदानातून पावन झालेल्या भुमितील माती कलश भरून आणले होते त्यांची पुजा करण्यात आली ते सर्व जल कलश आणी पावन माती कलश महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथामधील मोठ्या दोन कलशात समर्पित केले...

पश्चिम महाराष्ट्र राष्ट्रवादी महाराष्ट्र गौरव यात्रेचे प्रमुख लतीफभाई तांबोळी यांनी या यात्रेचा उद्देश स्पष्ट करताना संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती कशी झाली त्यासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांची माहीती आजच्या युवा पिढीला व्हावी त्याकरता महाराष्ट्र गौरव महोत्सव साजरा करण्यात येत आहे अशी माहीती दिली ...

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव श्रीनिवास कोंडी अनिल उकरंडे हेमंत चौधरी महेश निकंबे चंद्रकांत दायमा आनंद मुस्तारे बाबा बाई सालार जनरल सेक्रेटरी प्रमोद दादा भोसले महिला अध्यक्ष संगीताताई जोगदनकर महिला कार्याध्यक्ष चित्राताई कदम प्रदेश सचिव इरफान शेख सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव युवक कार्याध्यक्ष तुषार जक्का महेश कुलकर्णी साजिद शेख दत्ता बडगंची सामाजिक न्याय विभागाचे कार्याध्यक्ष अनिल बनसोडे सांस्कृतिक विभागाचे अध्यक्ष आशुतोष नाटकर सहकार सेल अध्यक्ष भास्कर अडकी अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष संजय मोरे ओबीसी विभागाचे कार्याध्यक्ष आयुब शेख वैद्यकीय विभागाचे शहराध्यक्ष बसवराज कोळी शहर उपाध्यक्ष सुजित अवघडे विनायक रायकर शामराव गांगर्डे कार्यालयीन सचिव दत्ता अण्णा बनसोडे कामगार संघटनेचे अध्यक्ष मातंर्डे शिंगारे कार्याध्यक्ष संजय सांगळे सोशल मीडिया अध्यक्ष वैभव गंगणे कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे शहर मध्य विधानसभा अध्यक्ष अलमेहराज आबादीराजे शहर दक्षिण विधानसभा अध्यक्ष श्रीकांत वाघमारे शहर उत्तर विधानसभा अध्यक्ष अमोल कोटीवाले प्रकाश झाडबुके प्रदीप बालशंकर शत्रुघन माने सागर गव्हाणे विकास काकडे महेश वटकर प्रभाग नागटिळक नईम सालार अश्फाक कुरेशी नवाज हुंडेकरी मोईज मुल्ला जहीर शेख अतीक शेख आनंद इंगळे ऋतिक वाघमारे आशिष कदम हार्दिक सरवदे वैभव कांबळे सामय्या हनुमानला अलमला रोहित गायकवाड राहुल वाघमारे बब्बू अडडेवाले सुरेखा ताई घाडगे शोभाताई गायकवाड लक्ष्मी पवार सुनिता ताई बिराजदार स्वामी ताई मीनाताई जाधव अर्चनाताई दुलंगे रेणुका मंद्रूपकर मीना जाधव आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त उपस्थित होते.

# मुंबईत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट' चे भव्य आयोजन : उद्योग मंत्री उदय सामंत

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे २०२५ पर्यंत 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी 1 मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे.

उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई हे देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिट'चा उद्देश आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले

उद्योग मंत्री सामंत यांनी सांगितले की, या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रीस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निमार्तेही कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

'हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्याची संधी आहे. या भव्य आयोजनासाठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे,' असे आवाहनही उदय सामंत यांनी केले.

# एल्डर लाईन - १४५६७ (ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन)

**काही प्रस्तावित शीर्षके : एल्डर लाईन -ज्येष्ठांचा आधार... / जेष्ठांच्या मदतीला 'एल्डरलाईन १४५६७ '... / ज्येष्ठ नागरिक हेल्पलाईन वर दर वर्षी येतात लाखो कॉल्स...**

**एल्डर लाईन १४५६७ :**

गेल्या काही दशकांमध्ये वृद्धांच्या संख्येमध्ये वेगाने वाढ नोंदवली गेली आहे. सध्या, देशामध्ये सुमारे १५ कोटी लोकसंख्या ६० वर्षांपेक्षा जास्त वयाची आहे, ही देशातील एकूण लोकसंख्ये पैकी ९ % पेक्षा जास्त आहे. विविध संशोधन, कागदपत्रांनुसार, ही संख्या २०५० पर्यंत साधारण ३५ कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. भारतातील ज्येष्ठ नागरिकांची सहानुभूतीपूर्वक सेवा करून सुखी आणि निरोगी जीवन वृद्धींगत करण्यासाठी, विविध सरकारी विभाग, सामाजिक संस्था, स्वयंसेवक, अशा अनेक वचनबद्ध भागीदारांच्या सहभागातून आवश्यक ती माहिती आणि सहकार्य करून, भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय भारत सरकार मार्फत देशभरातील ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या निवारणासाठी राष्ट्रीय टोल फ्री हेल्पलाइन; एल्डरलाईन- १४५६७, सर्व राज्यांत व केंद्र शासित प्रदेशात सुरु करण्यात आली आहे. सदर हेल्पलाईन राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (ठक्रऊ), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फाउंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यामध्ये चालविण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यात एल्डर लाईन १४५६७ ही सेवा ऑगस्ट २०२१ पासून राबवली जात आहे. या मध्ये कनेक्ट सेंटर व फिल्ड टीम, विविध शासकीय यंत्रणा, पोलीस प्रशासन, विविध ज्येष्ठ नागरिक संघटना, विविध स्वयंसेवी संस्था, कायदेविषयक सल्लागार, समुपदेशक, स्वयंसेवक आदींच्या सहभागातून व मदतीने कार्यरत आहे. आज अखेर, राज्यभरातून जेष्ठ नागरिकांसाठी चार लाखाहून अधिक कॉल्स आले आहेत. त्यामध्ये जेष्ठ नागरिकांना प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रकारे मदत हेल्पलाइन ने केली आहे. तसेच तीस हजार हून अधिक प्रकरणे क्षेत्रीय पातळीवर यशस्वीरित्या हाताळली आहेत .

**हेल्पलाईनशी संबंधित अत्यंत महत्त्वाची माहिती :**

एल्डर लाईन साठी १४५६७ हा क्रमांक टोल-फ्री आहे. एल्डर लाईन चे कार्य आठवड्याचे सर्व दिवस (म्हणजेच रविवार ते शनिवार) सकाळी ८.०० ते संध्याकाळी ८.०० चालते. संपूर्ण वर्षातील ३६२ दिवस सुरू असते (फक्त २६ जानेवारी, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर रोजी सुट्टी असते)

**एल्डर लाईन द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा:**

माहिती देणे : आरोग्य विषयक जागरूकता, वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, पोषण, सांस्कृतिक, कला, ज्येष्ठां संबंधी अनुकूल उत्पादने, आणि मनोरंजनाशी संबंधित माहिती.

मार्गदर्शन : कायदेविषयक (वैयक्तिक आणि कौटुंबिक स्तरावर दोन्ही), विवाद निराकरण (मालमत्ता, शेजारी इ.), आर्थिक, पेन्शन संबंधित सल्ला, आणि सरकारी योजनांची माहिती

भावनिक समर्थन: चिंता निराकरण, नातेसंबंध व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित भीती निवारण, जीवन व्यवस्थापन, (वेळ, ताण, राग व्यवस्थापन) मृत्यूपूवीर्चे दस्तऐवजीकरण (मृत्युपत्र बनवण्याचे महत्व इ.)

क्षेत्रीय पातळीवर मदत: विविध सरकारी यंत्रणा, भागधारक, स्वयंसेवक, सामाजिक संस्था यांचे मदतीने बेघर वृद्ध, अत्याचारग्रस्त ज्येष्ठ नागरिक, किंवा हरवलेल्या व्यक्तींना मदत करण्याचा प्रयत्न व त्यांना परिवाराशी पुनर्मिलन करणे साठी कार्य करणे.

**एल्डर लाईन टीम विषयी :**

एल्डर लाईन १४५६७ ची टीम कनेक्ट सेंटर च्या माध्यमातून व जनसेवा फौन्डेशन च्या माध्यमातून संस्थापक चेअरमन डॉ. विनोद शहा, सौ.मीना शहा , श्री जयदेव नाईक व अन्य विश्वस्त तसेच महाराष्ट्र राज्य एल्डर लाईन १४५६७ चे प्रकल्प व्यवस्थापक: श्री. स्मितेश शहा, टीम लीडर : प्रियांका कांबळे, गजानन इंगळे. स्टेला काकडे, राजेंद्र आहेर यांचे सह सर्व कनेक्ट सेंटर ऑफिसर सातत्याने कार्यरत आहेत.

**अधिक माहिती :** एल्डर लाईन १४५६७ या हेल्पलाईन आणि तिच्या संपूर्ण भारतातील सेवांबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी वेबसाईट www. elderline.dosje.gov.in

**एल्डर लाईन १४५६७ महाराष्ट्र ने प्रत्यक्ष केलेले मदत कार्याची उदाहरणे - Success Stories**

मुंबई मध्ये सापडलेले एक ज्येष्ठ नागरिक स्मृतीभ्रंश असलेमुळे आपला घरचा पत्ता नीट सांगू शकत नव्हते, दोन महिन्यांचे पाठपुराव्यातून सदर व्यक्तीचे गुजरात मधील घर व नातेवाईक शोधले सदर व्यक्ती ३० वर्षापूर्वी घर सोडून गेल्याचे कळले आशा वृद्धास तीस वर्षानंतर परिवाराशी पुनर्मिलन करून संपूर्ण भारतात एक वेगळा आदर्श निर्माण करण्याचे कार्य एल्डर लाईन महाराष्ट्र ने केले आहे.

हैद्राबाद येथील एका मुलाने ७० वर्षीय मावशीला शिर्डी येथे देवदर्शनाला जायच्या नावाखाली मुंबई येथे सायन भागात सोडून निघून गेला. रात्र झाल्यानंतर सायन पोलिसांनी सदर आजींचा व्हिडीओ सर्वत्र पाठवल्यानंतर महाराष्ट्र टीम, सायन पोलीस, हैद्राबाद टीम ने ३६ तासाचे आत सदर आजींच्या नातेवाइकाना शोध घेतला व त्यांचे समुपदेशन करून वृद्ध महिलेच्या परिवाराशी पुनर्मिलन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

अमरावती जिल्ह्यातील एका ज्येष्ठ नागरिक व्यक्तीला त्याची मुल त्यांना सांभाळत नाही व केस करून सुद्धा काहीच कार्यवाही झाली नाही. त्यानंतर हेल्पलाईन प्रतिनिधी यांनी पाठपुरावा करून जिल्हा प्रसासना मार्फत कार्यवाही केली व केस साठी तारीख दिली व केस सुरू झाली. यामध्ये मुलांना बोलावण्यात आहे व त्यांनी केस सुरू होण्या आधीच मुलाने मान्य केले की ते महिन्याचा आई वडिलांचा खर्च देण्यास तयार आहे. हेल्प लाईन नी त्यांची मदत केल्या मुळे हे सर्व लवकर होऊ शकले असे समस्या ग्रस्त व्यक्ती नी म्हटले व हेल्प लाईन चे आभार मानले

**मनोगत**

... म्हणून एकटे राहण्याची वेळ: 'एल्डर लाइन १४५६७ चे कार्य सुरू झाल्यापासून त्याचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक ज्येष्ठ व्यक्तीला मोठा आधार झाला आहे. सर्व ज्येष्ठ नागरिकांना याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी एक जागरूक नागरिक या नात्याने समाजाने याचा योग्य फायदा घेणे महत्त्वाचे आहे. देशात ज्येष्ठांची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. मुले परदेशी वास्तव्यास असल्याने आणि मुलीचे लग्न झाल्याने घरात जेष्ठ व्यक्तींना एकटेच राहण्याची वेळ आली आहे. त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय हेल्पलाइन सक्रीय आहे व कार्यरत आहे. तरी, ही माहिती जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचवावी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी जागरूकता निर्माण करावी.'

**- स्मितेश शहा,** प्रकल्प व्यवस्थापक, एल्डर लाईन १४५६७ महाराष्ट्र राज्य.